# गोदावरी माहात्म्य

## (गोदावरीची उपासना आणि पावित्र्यरक्षण यांसह)

## अनुक्रमणिका

काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे (मुद्दे) '⁕' या चिन्हाने दर्शवली आहेत.


१. 'गोदावरी' या शब्दाची व्युत्पत्ती आणि अर्थ ८
२. गोदावरीचे भूलोकातील अवतरण ८
⁕ गौतमऋषींनी घोर तपश्चर्या करून गोदावरीला भूलोकी आणणे ८
३. गोदावरीची काही नावे ९
४. गोदावरीची वैशिष्ट्ये १०
⁕ जीवनदायिनी ⁕ पापविनाशिनी ⁕ मोक्षदायिनी १०
५. गोदावरीचे महत्त्व १३
६. गोदावरीच्या तिरावरील प्रमुख तीर्थे आणि तीर्थक्षेत्रे यांचे महत्त्व १५
⁕ त्र्यंबकेश्वर ⁕ नाशिक ⁕ सप्तगोदावर तीर्थ १५
७. गोदावरीशी संबंधित उपासना २३
⁕ गोदावरीस्नान करण्याचे महत्त्व २४
⁕ गोदावरीशी संबंधित सण आणि उत्सव २५
८. श्री गंगागोदावरी स्नानविधी आणि पूजाविधी २७
९. गोदावरी नदीवरील सिंहस्थ महापर्व ३६
⁕ पुष्करमेळा आणि सिंहस्थ कुंभमेळा ४०
१०. सिंहस्थ पर्वकाळात गोदावरी तिरावर करावयाचे धार्मिक विधी ४२
११. देवनदी गोदावरीचे रक्षण करा ! ४७
⁕ गोदावरी प्रदूषित झाल्याने तिच्या पावित्र्याची होणारी हानी ! ४८
१२. गोदावरीची अलौकिकता जगासमोर आणा ! ५०
१३. भावी हिंदु राष्ट्रात गोदावरी परम पवित्र तीर्थ असेल ! ५१

# मनोगत

सर्वतीर्थशिरोभूताम् आद्यां गोदां च धीमहि ।
धर्मं या नः प्रचोदयात् ।। (संदर्भ : अज्ञात)

अर्थ : सर्व तीर्थांमध्ये श्रेष्ठ आणि नद्यांमध्ये आद्य अशा गोदावरीचे आम्ही ध्यान करतो. ही गोदावरी आम्हाला धर्माचरणासाठी सत्प्रेरणा देवो.

पुण्यनदी गोदावरी म्हणजे हिंदु संस्कृतीचा एक ऐतिहासिक आणि समृद्ध वारसा ! या पुण्यसलिलेच्या तिरावर सनातन धर्मसंस्कृतीचा विकास झाला. येथेच यज्ञवेत्त्या ऋषिमुनींनी वास्तव्य केले आणि प्रभु श्रीरामचंद्रांनी सीतेसह १२ वर्षे निवास केला. गोदावरीचा इतिहास हा उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय संस्कृतींच्या संगमाचा इतिहास आहे. आर्यावर्तातील अनेक धर्मपुरुषांनी गोदाकाठी वास केल्यामुळे हा सांस्कृतिक संगम धर्मग्रंथांमध्येही ग्रथित झालेला आढळून येतो.

गौतमी साक्षात् गंगा आहे. सरस्वतीप्रमाणेच ती 'नदी-तमा', म्हणजे सर्वश्रेष्ठ नदी आहे. ही गंगा सर्वपापक्षालन करणारी आणि मोक्षदायिनी आहे. ही गोदा सुखदा आणि सुकृता आहे. भागीरथीद्वारे भगीरथाने सहस्रो सगरपुत्रांचा उद्धार केला. तेच महत्कार्य गौतमऋषींच्या आशीर्वादाने गोदावरीने दक्षिण भारतातील कोट्यवधी भक्तांसाठी केले. अशी ही अमृताचा स्रोत असलेली सुरसरिता हिंदूंची तीर्थरूप जननी आहे. तिच्या केवळ दर्शनाने पापांचा नाश होतो. पाप-ताप निवारण करणाऱ्या महानदी गोदेचे गुणगान किती करावे !

सिंहस्थ महापर्वात गोदावरीस्नान केल्याने नेहमीच्या गोदास्नानाच्या तुलनेत १ लक्ष पटींनी अधिक आध्यात्मिक लाभ होतो. दक्षिण आणि पश्चिम भारतातील एकमेव असलेल्या या सिंहस्थ कुंभमेळ्याचे महत्त्व वेदांपासून संत तुकाराम महाराजांच्या गाथेपर्यंत सर्वत्र उद्धृत करण्यात आले आहे. म्हणूनच प्रस्तूत ग्रंथात गोदावरीशी संबंधित सिंहस्थ महापर्वादी उत्सवांची माहिती आणि सिंहस्थ यात्राविधी, तसेच संपूर्ण 'गंगागोदावरीस्नानविधी', श्री गोदावरीदेवीशी संबंधित उपासना कशी करावी, याचे मार्गदर्शन केले आहे. आज देवनदी गोदावरी प्रदूषित नदी बनली आहे. तिच्या रक्षणासाठी कसे प्रयत्न करावेत, हेही या ग्रंथात विशद केले आहे.

पुण्यसरिता गोदावरी नदीचे माहात्म्य सर्वांना कळावे, हे या ग्रंथाचे प्रयोजन आहे. गोदावरीचे माहात्म्य कळले, तरच श्रद्धायुक्त मनाने तिचे रक्षण आणि संवर्धन करणे शक्य होईल अन् त्यामुळे ही गंगा-गौतमी-गोदावरी युगानुयुगे सकल जनांना पवित्र करून शाप-पाप-ताप-संसारचक्र यांपासून मुक्ती देत राहील. ग्रंथांचे हे प्रयोजन सफल व्हावे, ही गौतमी गंगेच्या चरणी प्रार्थना ! - **संकलक**